<u>**अंतकालीन नफा क्र. ०१/२०१९**</u>
<u>**निशाणी २० पुढे सुरु**</u>

शपथेवर पुढे सुरु –

<u>**गैरअर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांच्यामार्फत उलटतपास**</u>

८. प्लॉट नं २७२९ जुना शिट न. १७/अ त्याचे क्षेत्र ५ x ५ फुट मी शासनाकडुन सन १९७२ मध्ये भाडेपट्टयाने घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ५ x ५ फुट जागा भाडेपट्टयाने घेतली त्यावेळी ती रिकामी जागा होती. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, त्या ठिकाणी दुकान होते. सदर भाडेपट्टा शासन मला प्रत्येक वर्षी वाढवुन देत होते. भाडेपट्टयाने जागाा घेतल्यानंतर मी ५ x ५ फुट जागेवर पानपट्टीचा एक खोका ठेवला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर ५ x ५ फुट जागा पानपट्टीच्या खोका ठेवण्यासाठी आवरण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या खोक्याच्या चारही बाजुने ६-६ इंच जागा व्यापण्यात आलेली होती. ज्या प्रमाणे मी शासनाकडुन भाडेपट्टयाची मुदत वाढवुन घेत होतो त्याप्रमाणे प्रत्येक वर्षी शासन अभिलेखात सदर जागेच्या भाडयाबद्दल त्याची नोंद करण्यात आली होती.

९. मी प्रस्तुत प्रकरणातील गैरअर्जदार यांचे विरुध्द दरखास्तचे प्रकरण क्र. ०१/२०१९ दाखल केलेले असुन त्यामध्ये मी सन १९८६–१९८७ ते सन १९९२ पर्यंत भाडेपट्टयाने दिलेल्या नझुल नोंदीचे दस्त दाखल केलेले आहे. सदर नोंदी ५ x ५ फुट जागेच्या आहेत. गैरअर्जदार यांनी नि.क्र. ६१ वर सदर भाडेपट्टयाचे सन १९८६ ते १९९२ या कालावधीचे तात्पुरत्या पट्टयाने दिलेल्या मागणीच्या नोंदवहीच्या एकुण ५ प्रती दाखल केलेल्या आहेत. सदरचे सर्व दस्तावेज मी दरखास्त क्र. ०१/२०१९ या प्रकरणात दाखल केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार यांनी दाखल केलेले सदरचे एकुण ५ दस्तावेज आणि त्यामधील मजकुर मला मान्य आहेत. त्यामुळे सदर दस्तांना **अनुक्रमे नि.क्र. ६२ ते ६६** देण्यात येते. सन १९७२ पासुनचा तात्पुरत्या पट्टयाने दिलेल्या मागणीच्या नोंदवहीचा अभिलेख माझ्याकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोंदवहीच्या अभिलेख व्यतिरिक्त माझ्याकडे शासनाला प्रत्येक वर्षी भाडे

दिल्याच्या पावत्या नाहीत. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, माझ्याकडे जुन्या भाडयाच्या काही पावत्या आहेत, मी सदर पावत्या न्यायालयात दाखल करु शकतो.

प्रश्न – वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम शासनाला दरवर्षी भरल्याबद्दलची नोंद नझुल अभिलेखात घेण्यात आलेली आहे ?

उत्तर – त्याची नोंद निश्चितच असायला पाहिजे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, बरेच वर्षपुर्वी पासुन प्रकरण चालु आहे, त्याच्यामुळे महसुल अभिलेखात त्याच्या नोंदी आहेत किंवा नाही मला माहित नाही.

१०. मी नि.क्र. ६२ ते ६६ च्या प्रती महसुल अभिलेखातुन काढल्या त्यावेळी मी ५ x ५ फुट जागेचा संपुर्ण नझुल अभिलेख पाहिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी ५ x ५ फुट जागेचा नगरपरिषदेचा कर कधीही भरलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कर भरलेला नसल्याने नगरपरिषदकडे कर भरावा लागतो किंवा कसे त्याबाबत चौकशी केली नाही.

**न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.03.26 10:57:59 +0530

दिनांक : २५/०३/२०२५.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.